दैनिक
# हॅलो बातमीदार
Email- hellobatmidar@gmail.com
जळगाव
RNI NO. - MAHMAR/2023/85315
संपादक : सुमेध पद्माकर सोनवणे
वर्ष : ३ रे | अंक १५५ | सोमवार दि.६ ऑक्टोबर २०२५ | पाने 4 | मुल्य रू.3

## थोडक्यात

### पंकज माध्यमिक विद्यालयाचा विद्यार्थी साई सोनवणे (शेटे) याने तब्बल ६८ चेंडूत १०३ धावांची खेळी

चोपडा प्रतिनिधी (मिलिंद वाणी)– चोपडा तालुक्यातील



अडावद येथील चोपडा पंकज माध्यमिक विद्यालयाचा विद्यार्थी साई सोनवणे (शेटे) याने जळगाव जिल्ह्या अंडर-१४ क्रिकेट संघात पंकज माध्यमिक विद्यालयाचा इयत्ता ९ वीचा विद्यार्थी साई सोनवणे ( शेटे) अडावद याने ६८ चेंडूत १०३ धावांची खेळी करून आपल्या विद्यालयाचे नाव जिल्हा संघात कोरले असून, हा विद्यालयासाठी अभिमानाचा क्षण आहे.

शेटे परीवाराकडुन विषेश अभिनंदन त्याची १०३ धावांची नेत्रदिपक खेळी करणाऱ्या चि. साई व त्याच्या, पालकांचे आणि चि. साई ला क्रिकेट चे धडे देणारे मार्गदर्शक अजय सैंदाने सरांचे चोपडा पंकज माध्यमिक विद्यालयाचा वतीने विषेश अभिनंदन करण्यात येत आहे. चि.साई सोनवणे (शेटे) रा.अडावद हा अडावद येथील बस स्थानक डेपो चे माजी व्यवस्थापक संजय सोनवणे यांचा पुतण्या असुन त्याचे सर्वच स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### ई नाशिक – त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा २०२७ आढावा बैठक

मुंबई : कुंभमेळा श्रद्धा, सांस्कृतिक आणि धार्मिक परंपरेचे प्रतीक आहे. नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्यासाठीची पायाभूत सुविधांची सर्व कामे दर्जेदार आणि गतीने पूर्ण करण्यात यावीत असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. नाशिकमधील नवीन रिंगरोडचे काम पूर्ण करण्याबरोबरच साधू ग्राम/टेंटसीटीसाठीची भूसंपादनाची कामेही गतीने पूर्ण करण्यात यावीत असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे नाशिक - त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा २०२७ आढावा बैठक झाली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे, पणनमंत्री जयकुमार रावल, नाशिक जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, मुख्य सचिव राजेशकुमार, पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला, संबंधित विभागांचे सचिव उपस्थित होते. नाशिकचे विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांनी सादरीकरणाव्दारे नियोजनाची माहिती दिली. जिल्हाधिकारी जलज शर्मा, आयुक्त मनीषा खत्री, कुंभमेळा प्राधिकरणाचे आयुक्त करिश्मा नायर हे उपस्थित होते. गर्दीचे नियोजन, कोणतीही दुर्घटना होऊ नये यासाठीच्या उपाययोजना करण्यात आल्याचे तसेच रस्त्यांची व मलनि:स्सारणाची कामे वेगाने पूर्ण करण्यास प्राधान्य देण्यात येत असल्याचे श्री. गेडाम यांनी सांगितले.

### मोटारसायकल अपघातात दोन युवकांचा मृत्यु,एक जखमी

शेंदुर्णी ता.जामनेर -सोयगाव येथील दुर्गा विसर्जन मिरवणुक बघुन शेंदुर्णी कडे येणाऱ्या आणि शेंदुर्णी येथुन सोयगाव जाणाऱ्या दोन मोटारसायकल यांच्या झालेल्या अपघातात येथील ओम कॉम्प्युटर चे संचालक मनोज जोशी यांचा एकुलता एक मुलगा नचिकेत मनोज जोशी व विशाल अशोक सुर्यवंशी या दोन युवकांचे निधन झाले आहे.यामुळे शेंदुर्णी शहरात शोककळा पसरली आहे.नचिकेत जोशी हा १८ वर्षांचा युवक त्रिविक्रम मित्र मंडळाचा सदस्य, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा स्वयंसेवक व शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान चा धारकरी होता.एवढ्या कमी वयात घरातील एकुलता एक मुलगा अपघातात मरण पावला यामुळे सगळाच गाव शोकमग्न आहे.याच अपघातात विशाल अशोक सुर्यवंशी वय २५ यांचेही निधन झाले आहे.मागच्याच वर्षी त्याच्या वडिलांचे निधन झाले आहे.दसऱ्याच्या नंतर व दुर्गा विसर्जन मिरवणुकीच्या आधी झालेल्या या अपघातामुळे शेंदुर्णीत शोककळा पसरली असुन नचिकेत व विशाल यांच्या अंत्ययात्रेला हजारो युवक सहभागी झाले होते

### नेपाळमध्ये पूर: भूस्खलनामुळे ५१ ठार तर, ५ जण बेपत्ता

काठमांडू - नेपाळच्या पूर्व भागामध्ये सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे आलेला पूर आणि भूस्खलनामुळे आजपर्यंत किमान ५१ जण ठार झाले आहेत. काल रात्रीपासून झालेल्या भूस्खलनामुळे अन्य पाच जण बेपत्ता झाले आहेत.कोशी प्रांतातल्या इलाम जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे शनिवारी रात्री झालेल्या भूस्खलनाशी संबंधित वेगवेगळ्या घटनांमध्ये किमान ३७ जण ठार झाले, असे नॅशनल डिजास्टर रिडक्शन ॲथोरिटीने म्हटले आहे.

यात डेउमाय आणि मायजोगमाय महापालिकांमध्ये प्रत्येकी ८, इलाम महापालिका आणि सॅन्डकपूर ग्रामीण भागात प्रत्येकी ६ जण ठार झाले. सुर्योदया महापालिकेमध्ये ५, मंगसेबंग महापालिकेमध्ये ३ आणि फाकफोकथुम गावात एक ठार झाला.

## सोनारीतील गुरांचा पाण्याचा हौद झाला शेवाळमय, चौफेर घाणीचे साम्राज्य! ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष गुरांच्या जीवावर उठणार का?'

(प्रतिनिधी:अमोल खरात)

जामनेर: : तालुक्यातील सोनारी गावात पिण्याच्या पाण्यासाठी असलेल्या गुरांच्या हौदाची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून, परिसरामध्ये घाणीचे साम्राज्य पसरले आहे. हौदातील पाणी पूर्णपणे हिरवेगार शेवाळमय झाले आहे, ज्यामुळे गुरांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

**गुरांच्या आरोग्याला धोका!**

सोनारी येथील ग्रामस्थांकडून वारंवार तक्रारी येत आहेत की, हौद नियमितपणे स्वच्छ धुतला जात नाही. हौदाच्या आजूबाजूला अस्वच्छता पसरलेली असल्याने गुरांना उभे राहण्यासाठीही योग्य जागा नाही. या संपूर्ण परिसरात तीव्र दुर्गंधी पसरत असून, सार्वजनिक आरोग्यावरही विपरीत परिणाम होण्याची भीती आहे. सध्या लम्पी सारख्या महाभयंकर आजाराचा धोका असताना, गुरांना पिण्यासाठी



असे दूषित, शेवाळयुक्त पाणी उपलब्ध असणे आणि आजूबाजूला घाण असणे, हे परिसरातील नागरिक व गुरांसाठी रोगकारक ठरू शकते. तहानलेल्या गुरांना नाइलाजाने हे दुर्गंधीयुक्त आणि दूषित पाणी प्यावे लागत आहे.

**ग्रामपंचायतीचे तातडीने लक्ष देण्याची गरज**

या गंभीर समस्येकडे ग्रामपंचायतीने तातडीने लक्ष देणे अत्यंत आवश्यक आहे. हा हौद वेळोवेळी स्वच्छ धुवून काढणे गरजेचे आहे. पाण्यात कीटकनाशक आणि जंतुसंसर्ग होऊ नये म्हणून पावडर टाकावी. जमा झालेले शेवाळ त्वरित साफ करावे. यावर तातडीने उपाययोजना न केल्यास, ही घाण आणि दूषित पाणी गुरांच्या जीवावर उठण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सोनारी ग्रामपंचायतीने ग्रामस्थांच्या आणि मुक्या जनावरांच्या आरोग्याचा विचार करून या समस्येचे निराकरण त्वरित करावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

## गांधी रिसर्च फाउंडेशनतर्फे शिरसोली येथे दंत तपासणी शिबीर



जळगाव(प्रतिनिधी) - गांधी रिसर्च फाउंडेशन , रोटरी क्लब ऑफ रॉयल, इंडियन डेंटल असोसिएशन जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने शिरसोलीत दंत तसासणी शिबीर घेण्यात आले. शिबिरात एकूण २०० विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली. रोटरी क्लब रॉयलचे अध्यक्ष जितेंद्र भोजवानी, जितूलाल रोटे, डॉ. जयदीपसींग छाबडा, डॉ. बिंदू छाबडा, डॉ. वर्षा रंगलानी, डॉ. स्नेहल महाजन यांनी सेवा दिली.

बारी समाज प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी मोफत मौखिक दंत तपासणी शिबीर आयोजित केले होते. यावेळी विद्यार्थ्यांना वैक्तिगत स्वच्छतेबाबत प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. आरोग्यावर आधारीत नाटीका सादर करण्यात आली. डॉ. ज्योत्सना पाटील यांनी 'व्यसनांचे दुष्परिणाम' या विषयी माहिती दिली. रोटरी क्लबकडून मुलांना ब्रश व बिस्कीट वाटप करण्यात आले. शिबिरात डॉक्टरांनी दातांच्या आरोग्याची काळजी कशी घ्यावी?, ब्रश कसा करावा?,दातांच्या आरोग्यासाठी पोषक आहार कोणता घ्यावा?, त्याचबरोबर तंबाखू, गुटखा, सुपारी या व्यसनापासून दूर राहावे, याबाबत मार्गदर्शन केले. उपचारांची गरज असलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांपर्यंत संदेश पोचविण्यासाठी गांधी रिसर्च फाउंडेशनचे स्वयंसेवक विक्रम अस्वार, ग्रामपंचायत सदस्य रामकृष्ण काटोले व श्रावण ताडे, मुदतसर पिंजारी मदत करणार आहेत. प्रास्ताविक प्रशांत सुर्यवंशी यांनी केले. शिबिराच्या व्यवस्थापणासाठी शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र आंबटकर व शिक्षक वृंद यांनी परिश्रम घेतले.

## बौद्ध वसाहतीतील स्मारकासाठी भूसंपादनाचा प्रश्न मार्गी लावणार – पालकमंत्री गुलाबराव पाटील यांचे आश्वासन

उपसंपादक:– मिलिंद जंजाळे

दि. ५ ऑक्टोबर २०२५



जळगाव शहरातील सिव्हिल हॉस्पिटल समोरील बौद्ध वसाहत येथे उभारण्यात येणाऱ्या तथागत भगवान गौतम बुद्ध व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठी आवश्यक भूसंपादनाच्या निधीच्या मागणीसंदर्भात आज दिनांक ५ ऑक्टोबर २०२५ रोजी जिल्ह्याचे पालकमंत्री माननीय श्री. गुलाबराव पाटील यांना बौद्ध वसाहत सेवा संघ तर्फे तसेच समस्त बौद्ध समाज बांधवांच्या वतीने निवेदन सादर करण्यात आले.या निवेदनाद्वारे स्मारकासाठी आवश्यक निधी लवकरात लवकर उपलब्ध करून देत भूसंपादनाची प्रक्रिया गतीमान करण्याची मागणी करण्यात आली. या प्रसंगी पालकमंत्री श्री. पाटील यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ सूचना देत येणाऱ्या गुरुवार व शुक्रवार रोजी जिल्हाधिकारी आणि आयुक्त यांच्या संयुक्त बैठकीचे आयोजन करण्याचे निर्देश दिले. तसेच या बैठकीत संबंधित प्रश्नावर सविस्तर चर्चा करून प्रश्न तातडीने मार्गी लावला जाईल, असे आश्वासनही त्यांनी उपस्थितांना दिले.बौद्ध समाज बांधवांसाठी या स्मारकाला विशेष ऐतिहासिक व सांस्कृतिक महत्त्व आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या भूसंपादनाच्या प्रश्नावर आता प्रशासनाच्या पातळीवर हालचाली सुरू झाल्याने परिसरातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या वेळी बौद्ध वसाहत सेवा संघाचे पदाधिकारी, समाजबांधव व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भडगाव येथील जेष्ठ पत्रकार विठ्ठलराव मराठे यांची उत्तर महाराष्ट्र अध्यक्षपदी निवड

भडगाव-दिनांक ४ ऑक्टोबर रोजी पाचोरा येथे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचा विभागीय अधिवेशन आयोजित करण्यात आले होते.

याप्रसंगी महाराष्ट्र पत्रकार संघाचे अध्यक्ष आरोटे साहेब यांच्या उपस्थितीत पाचोरा भडगाव विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार दिलीप भाऊ वाघ पाचोरा पोलीस स्टेशनचे पीआय राहुल पवार साहेब पत्रकार संघाचे प्रदेश उपाध्यक्ष किशोर भाऊराव साकडा पोलीस शोध न्युज पेपरचे संपादक नरेंद्र जमादार यांच्यासह अनेक मान्यवरांच्या उपस्थित भडगाव येथील जेष्ठ पत्रकार विठ्ठलराव मराठे यांची उत्तर महाराष्ट्र अध्यक्षपदी निवड करण्यात आली निवडीचे पत्र त्यांना आरोटे साहेब यांच्या हस्ते देण्यात आले.

यावेळी जळगाव जिल्ह्यातील हजारो पत्रकारांचे उपस्थिती होती



या या कार्यक्रमाला पाचोरा भडगाव चे विद्यमान आमदार किशोर आप्पा पाटील मार्केट कमिटीचे सभापती गणेश भीमराव पाटील जि प सभापती रावसाहेब मनोहर गिरधर पाटील चाळीसगाव येथील जेष्ठ पत्रकार किसनराव जोरवेकर साहेब यांच्यासह अनेक पत्रकारांच्या उपस्थितीत भडगाव येथील जेष्ठ पत्रकार विठ्ठलराव मराठे यांची जळगाव धुळे नाशिक नंदुरबार अहिल्यानगर या खानदेश स्तरीय उत्तर महाराष्ट्राच्या आद्य अध्यक्षपदी निवड झाल्याने सर्वच पत्रकार बांधवांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## साकळी येथे मोफत मोतीबिंदू नेत्र तपासणी शिबिराचे भव्य आयोजन

### मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत ग्रामपंचायत साकळी व समता फाऊंडेशन, जळगाव यांचा उपक्रम





उपसंपादक
मिलिंद जंजाळे

साकळी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत ग्रामपंचायत साकळी आणि जळगाव येथील समता फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सलग तिसऱ्या वर्षी मोफत मोतीबिंदू नेत्र तपासणी शिबिराचे भव्य आयोजन करण्यात आले.

ग्रामपंचायत कार्यालय, साकळी येथे भरविण्यात आलेल्या या शिबिराला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

ग्रामीण भागातील विशेषतः मोतीबिंदूने त्रस्त असलेल्या रुग्णांसाठी हे शिबिर अत्यंत उपयुक्त ठरले. तज्ञ डॉक्टर व नेत्र तपासणी पथकाने उपस्थित रुग्णांची तपासणी करून आवश्यक मार्गदर्शन व उपचार सेवा पुरविली. नागरिकांसाठी मोफत नेत्र तपासणी, निदान तसेच पुढील शस्त्रक्रिया व उपचारांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या.शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रामपंचायतीचे पदाधिकारी, कर्मचारी व आरोग्य विभागाचे सहकार्य लाभले.

या उपक्रमामुळे साकळी व परिसरातील नागरिकांना दर्जेदार व मोफत नेत्रसेवा मिळाली असून, विशेषतः वृद्ध नागरिकांसाठी हे शिबिर आशेचा किरण ठरले आहे.

## संपादकीय

### बालिशपणा

दुबईमध्ये पार पडलेल्या आशिया करंडक क्रिकेट स्पर्धेतील विजेता निश्चित झाला असला आणि भारताने अंतिम सामन्यात पाकिस्तानवर मात करून या करंडकावर नाव कोरले असले, तरी अद्यापही या स्पर्धे वरून निर्माण झालेला वादविवाद सुरूच आहे. आशियाई क्रिकेट कौन्सिलचे अध्यक्ष आणि पाकिस्तानी क्रिकेट बोर्डाचे पदाधिकारी मोहसीन नक्वी यांनी विजेता कर्णधार सूर्यकुमार यादवला प्रदान केली नाही ती ट्रॉफी घेण्यासाठी सूर्यकुमारने दुबईमध्ये यावे, अशी सूचना केली आहे. गेल्या रविवारी जेव्हा अंतिम सामन्यामध्ये भारताने पाकिस्तानवर मात करून स्पर्धेचे विजेतेपद मिळवले तेव्हा विजेता संघ मोहसीन नक्वी यांच्याकडून ट्रॉफी किंवा मेडल्स घेणार नाही हे आधीच ठरले होते. त्याची कल्पना असूनही समारंभामध्ये नक्वी यांनी गोंधळाचे वातावरण निर्माण केले.

मी एखाद्या कार्टूनप्रमाणे भारतीय खेळाडूंची वाट बघत उभा होतो अशा प्रकारचे विधान नंतर नक्वी यांनी केले आणि आपण खरोखरच कार्टून आहोत हे ते सातत्याने सिद्ध करत आहेत. पाकिस्तानचे गृहमंत्री असलेल्या आणि भारताविरोधात सतत गरळ ओकणार्या आणि भारतावर अणुहल्ल्याची धमकी देणार्या मोहसीन नक्वी यांच्याकडून आम्ही विजयी ट्रॉफी स्वीकारणार नाही याची कल्पना भारतीय संघ व्यवस्थापनाने आधीच पाकिस्तानला आणि आयसीसीला दिली होती. अंतिम सामन्याच्या बक्षीस वितरण समारंभात नक्वी यांच्याऐवजी कोणाकडूनही ट्रॉफी आणि मेडल स्वीकारण्याची तयारी भारतीय संघ व्यवस्थापनाने केली होती.

पण त्यावेळी मोठे मन दाखवायची संधी उपलब्ध झाली असतानासुद्धा मोहसीन नक्वी यांनी गल्ली क्रिकेटमधील मानसिकता दाखवून ट्रॉफी अन्य कोणाच्या हस्ते भारतीय संघाला न देता सरळ ती ट्रॉफी घेऊन ते आपल्या हॉटेलच्या रूममध्ये परतले होते. या विषयावरून वादंग निर्माण होणार आणि आयसीसीकडून किंवा बीसीसीआयकडून जाब विचारला जाणार याची खात्री असल्यानेच नक्वी यांनी या संपूर्ण विषयाबाबत पडदा टाकण्याचा जरी प्रयत्न केला असला, तरी त्यांनी ही ट्रॉफी मिळवण्यासाठी भारतीय कर्णधार सूर्यकुमार यादवने दुबईमध्ये यावे, अशी सूचना करून हा वाद न मिटवता उलट वाढवायचाच प्रयत्न केला आहे.

कारण आता आशियाई क्रिकेट समितीचे सर्व पदाधिकारी आणि नक्वी आणि पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे सर्व पदाधिकारीसुद्धा पाकिस्तानात परतले आहेत. सूर्यकुमार यादवने भर मैदानात नक्वी यांच्याकडून ट्रॉफी घ्यायला नकार दिला. सूर्यकुमार किंवा इतर संघ सहकारी फक्त ट्रॉफी नेण्यासाठी पुन्हा एकदा दुबईला जातील असे मानणे म्हणजे शुद्ध वेडेपणा आहे. बीसीसीआयने याच शब्दांमध्ये नक्वी यांना सुनावले आहे. अर्थात, आपली विचित्र विधाने आणि आपली विचित्र कृती यासाठी नेहमीच प्रसिद्ध असलेले हे पाकिस्तानचे गृहमंत्री महाशय नेहमीच कार्टून असल्याच्या अविर्भावातच वावरत असतात.

भारत-पाकिस्तान यांच्यामध्ये लष्करी संघर्ष सुरू असतानाही विविध प्रकारची विचित्र विधाने करून मीडियाचे लक्ष आपल्यावर कसे राहील याकडेच त्यांचे प्राधान्य असे. क्रिकेटमध्ये किंवा इतर कोणत्याही खेळामध्ये अशा प्रकारे राजकारण आणू नये असे बजावणार्या नक्वी यांनीच या सर्व विषयाला सुरुवात केली होती हेसुद्धा नाकारून चालणार नाही. आशियाई क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी ही स्पर्धा व्यवस्थित पार पाडणे आवश्यक होते. बक्षीस समारंभाच्या वेळी मोठ्या मनाने त्यांनी तेथील दुबईचे पदाधिकारी किंवा बांगलादेशचे पदाधिकारी यांच्या हस्ते जर ट्रॉफी दिली असती, तर हा विषय निर्माण झाला नसता आणि वाढला नसता.

अतिशय अहंकारी वृत्तीचे आणि बालिश पद्धतीने वर्तन करणारे नक्वी यांच्याकडून तशी अपेक्षाच नव्हती. सूर्यकुमारने ट्रॉफी स्वीकारण्यास नकार दिल्यावर ती ट्रॉफी आपल्या हॉटेल रूममध्ये नेऊन नक्वी यांनी आपल्या बालिशपणाचा आणि कार्टूनपणाचा कळस दाखवून दिला. आयसीसी किंवा बीसीसीआय या विषयावर कठोर भूमिका घेण्याच्या तयारीत असल्याच्या बातम्या समोर आल्यानंतरही नक्वी यांनी विजयी ट्रॉफी सूर्यकुमार यादवला सहजासहजी देण्यास मात्र नकार दिला आहे आणि भारतीय संघ व्यवस्थापनालासुद्धा आता ती ट्रॉफी परत घेण्यात कोणताही रस नाही. त्या दिवशी मैदानावर हातात ट्रॉफी नसतानाही सूर्यकुमार आणि त्याच्या सहकार्यांनी वेगळ्या प्रकारे सेलिब्रेशन केले होते.

आशिया करंडक स्पर्धेचा चॅम्पियन भारत आहे याची नोंदही कागदावर झाली आहे. त्यामुळे ट्रॉफी हातात येवो किंवा न येवो भारत हाच चॅम्पियन आहे याबाबत कोणीही शंका घेऊ शकत नाही. मोहसीन नक्वी किंवा पाकिस्तानमधील इतर पदाधिकार्यांनी कितीही बालिश विधाने केली तरी त्याला बीसीसीआय किंवा भारतीय संघ व्यवस्थापन फारसे महत्त्व देईल असे नाही. एक मात्र निश्चित की लवकरच जेव्हा आयसीसीची मिटिंग होणार आहे. त्या मिटिंगमध्ये बीसीसीआय हा विषय उचलून धरणार आहे आणि मोहसीन नक्वी यांच्यावर आणखीन मोठी कारवाई करण्याचा आग्रहही केला जाईल अशी शक्यता आहे.

विजेत्या संघाला ट्रॉफी नाकारणे हे अत्यंत चुकीचे आहे, अशाच प्रकारची भूमिका बहुतेक क्रिकेट संघटनानी घेतल्यामुळे आपण या विषयावर उघडे पडले आहोत हे नकवी यांच्या लक्षात आले आहे. विजेत्या संघाला ट्रॉफी नाकारणार्या अधिकार्यावर कारवाई होणे अत्यंत गरजेचे आहे. तरच सभ्य गृहस्थांचा खेळ म्हणून ओळखल्या जाणार्या क्रिकेटमध्ये पुन्हा एकदा सभ्यपणा प्रस्थापित केला जाईल.

# महात्मा गांधी जयंतीनिमित्त इंडोनेश्या देशाचे पदमश्री अगूस उदयाना यांना महात्मा गांधी पुरस्कार व आदर्श माता शेवराबाई ज्ञानदेव भोसले यांना उदयाना यांच्या हस्ते सन्मान

प्रतिनिधी पुणे सुनिल ज्ञानदेव भोसले



पुणे - कोथरूड येथील गांधी भवन हॉलमध्ये आज रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी पुरस्कार सोहळा संपन्न झाला.राष्ट्रपिता महात्मा गांधी पुरस्कार समिती आणि ट्रॅव्हएक्स्पर्ट डेस्टिनेशन्स यांच्या वतीने दरवर्षी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना हा पुरस्कार प्रदान केला जातो. यंदाचा मानाचा पुरस्कार इंडोनेशियातील बाली येथील गांधी पुरी आश्रमचे 'पद्मश्री अगुस इंद्रा उदयाना' यांना जाहीर करण्यात आला होता. भारताबाहेर महात्मा गांधींचे विचार व कार्य प्रसारित करण्यासाठी त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेऊन त्यांना गौरविण्यात आले. हा पुरस्कार एअरमार्शल अविनाश क्षीरसागर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भोसले ग्रुप ऑफ इंडस्ट्रीजचे किसन भोसले होते.याप्रसंगी प्रमुख पाहुणे ऍडव्होकेट अभय छाजेड म्हणाले,गांधीजी जेव्हा आफ्रिकेतून भारतात आले आणि त्यांनी स्वातंत्र्य लढा सुरु केला तेव्हा जगभरात महायुद्धाचे सावट होते, महात्मा गांधी यांनी अहिंसेच्या मार्गाने स्वातंत्र्य लढा दिला त्यावेळी हे खरे महत्वाचे होते, आजचे पुरस्काराराथीं पदमश्री अगूस इंद्र उदयाना हे खऱ्या अर्थाने गांधीजींचे अनुयायी आहेत हे त्यांच्या इंडोनेशियामधील गांधीपुरी आश्रमाच्या स्थापनेवरून दिसून येते. गांधीजींचे विचार परदेशात प्रचार प्रसार करणारे शरयू अगूस हे या पुरस्काराचे मानकरी आहेत...कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे एअर मार्शल श्री अविनाश क्षीरसागर ज्यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला देशाला पुढे न्यायचे असेल तर शिक्षण फार महत्वाचे आहे तसेच गांधीजींनी दिलेली स्वच्छतेची शिकवणूक आज प्रत्येक भारतीयाने अंगीकारणे महत्वाचे आहे. या सोहळ्याला चित्रपट लेखक आणि दिग्दर्शक धनंजय भावलेकर या ॲड. अभय छाजेड, सचिव अन्वर राजन, माजी नगरसेवक प्रदीप (बाबा) धुमाळ, जमिर मुल्ला, लेखक-दिग्दर्शक धनंजय भावलेकर, दिग्दर्शक सागर वंजारी, ज्येष्ठ पत्रकार महावीर जोंधळे, इंदुमती जोंधळे, मनोविकास प्रकाशन चे अरविंद पाटकर, प्राज इंडस्ट्रिजचे राजेंद्र मोरे, समृद्धी हॉटेलचे अरविंद चव्हाण, सुनिल पवार, के. पी. जगताप, संदीप बर्वे, सचिन पांडुळे, रुपेश पार्टे, सचिन पार्टे, प्राणजित गवंडी, कुणाल मालुसरे, डॉ.राकेश शालगर, शशांक पाटील, शेखर ढमाले, नेहा ढमाले, कॅप्टन जगदीश जोशी, शैलेंद्र उत्तेकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.राष्ट्रीय पुरस्कार विजेते आदर्श माता शेवराबाई ज्ञानदेव भोसले या कार्यक्रमाचे आकर्षक ठरल्या आहे आपल्या मुलांना शिक्षणाचे मार्ग दिला आदिवासी पारधी समाजामध्ये महात्मा गांधीचे विचार मांडले गांधींचे विचाराने काम करत राहिले पारधी समाजाचे मुलं मुली आजही मार्गदर्शन घेण्यासाठी येतात माझी राज्यपाल भगत सिंह कोश्यारी यांच्या हस्ते राष्ट्रीय उत्कृष्ठ अवॉर्ड मिळाला त्यांच्या विचाराने अनेक मुलं मुली स्वतःच्या पाया वर उभे राहिले आहे व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. ट्रॅव्हएक्स्पर्ट डेस्टिनेशन्स प्रमुख माधवी शेलार यांनी कार्यक्रमची प्रस्तावना केली तर सुत्रसंचालन कपिल घोलप यांनी केले.

आभार श्री राहुल शेलार यांनी व्यक्त केले.या सोहळ्याचे आयोजन श्री. राहुल भरत शेलार व सौ. माधवी राहुल शेलार यांनी केले लोकशाही पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य भटक्य विमुक्त जाती जमाती आदिवासी प्रदेश आध्यक्ष पत्रकार सुनिल शेवाराबाई ज्ञानदेव भोसले . पत्रकार स्नेहा उत्तम मडावी

# मराठी शाळांचे अस्तित्व?



मराठी शाळांची घटती पटसंख्या हा आज अवघ्या महाराष्ट्रासमोर उभा ठाकलेला सर्वात गंभीर शैक्षणिक आणि सांस्कृतिक प्रश्न आहे.

'शाळा म्हणजे समाजाचा आरसा' असं म्हटलं जातं, आणि खरोखरच शाळांमध्येच समाजाचं भविष्य, विचारसरणी आणि संस्कृती प्रतिबिंबित होते. परंतु आज या आरशात आपल्याला काळजी वाटावी असं चित्र दिसतंय. कधीकाळी सकाळच्या प्रार्थनेत गाजणार्या गजराने, मुलांच्या किलबिलाटाने व शिक्षकांच्या प्रेरणादायी शिकवणीने उजळलेल्या मराठी शाळा आज शांत, रिकाम्या आणि ओसाड होत चालल्या आहेत.

पूर्वी एका गावात दोन-दोन तुकड्या भरत असत, शंभरावर विद्यार्थी वर्गखोल्यांत गजबजलेले असत. शाळेच्या अंगणात मुलांचा आनंदी कल्लोळ असायचा. खो-खो, कबड्डी, धावणं, लपाछपी, मामाचं पत्र हरवलं या खेळांनी आणि एकसुरात म्हटले जाणारे गणितातील पाढे इत्यादींमुळे शाळेचं वातावरण उत्साहाने नटलेलं असायचं. पण आज अनेक ठिकाणी एका तुकडीला देखील पुरेशी मुलं मिळणं कठीण झाले आहे. काही ठिकाणी तर शाळेच्या दारावर कुलूप पडलंय आणि त्या इमारती आता भुतांच्या वास्तूसारख्या ओसाड दिसू लागल्या आहेत.

या संकटामागे अनेक कारणं आहेत, जी एकमेकांशी गुंफलेली आहेत. पूर्वी कुटुंबं मोठी असायची, पाच-सहा, सात-आठ मुलं असणं हे सर्वसाधारण होतं. आता शिक्षण, नोकरी, वाढलेला जीवनमानदर्शक स्तर, महागाई, आरोग्य खर्च आणि नियोजित कुटुंब या कारणांमुळे आधुनिक कुटुंबं एक किंवा दोन मुलांवर समाधानी असतात. पण याचा थेट परिणाम शाळांच्या पटसंख्येवर झाला आहे.

यात आणखी भर पडली ती ग्रामीण ते शहरी स्थलांतराने. चांगल्या शिक्षणाच्या, नोकरीच्या, आरोग्याच्या आणि सुविधा मिळवण्याच्या इच्छेने ग्रामीण कुटुंबं गावं सोडून शहरात जायला लागली. मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर या शहरांमध्ये स्थलांतरितांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. गावात उरलेत ते ज्येष्ठ नागरिक, वृद्ध शेतकरी आणि मोजक्या कुटुंबांची मुलं. परिणामी गावातील शाळा अक्षरशः रिकाम्या होऊन गेल्या आहेत.

याचबरोबर पालकांच्या मानसिकतेतही मोठा बदल झाला आहे. आज पालक ठामपणे मानतात की मुलाने इंग्रजी माध्यमात शिकले नाही, तर तो काळाच्या स्पर्धेत मागे पडेल. जागतिकीकरणामुळे इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकणार्या विद्यार्थ्यांना नोकर्या आणि संधींची हमी मिळते, अशी समजूत पालकांमध्ये रुजली आहे. त्यामुळे अनेक पालक आपल्या उत्पन्नाचा मोठा भाग खर्च करतात किंवा कर्ज काढूनसुद्धा मुलांना इंग्रजी माध्यमाच्या खासगी शाळांत पाठवत आहेत. खासगी शाळांनीही पालकांची अचूक नाडी ओळखत, कल जाणून डिजिटल साधनं, वातानुकूलित वर्ग, भव्य इमारती, आकर्षक स्मार्ट बोर्ड, रंगीबेरंगी गणवेश यांचा वापर करून आपल्याकडे विद्यार्थ्यांना आकर्षित केलंय. या दिमाखदार जाहिरातींनी पालकांच्या मनात एक भ्रम निर्माण झालाय की इंग्रजी शाळा म्हणजे प्रगती आणि मराठी शाळा म्हणजे मागासलेपणा. परिणामी मराठी शाळा 'गरिबांची शाळा' म्हणून हिणवल्या जाऊ लागल्या.अनेक मराठी शाळांच्या पायाभूत सुविधाही अजून निकृष्ट अवस्थेत आहेत. जीर्ण इमारती, अपुर्या वर्गखोल्या, खेळ-साहित्याचा अभाव, प्रयोगशाळा नसणं, संगणक, ग्रंथालय नसणं, शौचालयांची बिकट स्थिती, प्यायला स्वच्छ पाण्याची सोय नसणं, विजेची व्यवस्था नसणं अशा अनेक गोष्टींमुळे पालकांचा ओढा झगमगाट असलेल्या खासगी इंग्रजी शाळांकडे वाढत आहे. याउलट खासगी शाळांची भव्य इमारत, मोठमोठ्या वर्गखोल्या, प्रत्येक खोलीत स्मार्ट बोर्ड, वातानुकूलन, स्वच्छ शौचालये, खेळाचं मैदान, संगणक प्रयोगशाळा, ग्रंथालय, विज्ञान प्रयोगशाळा या सर्व गोष्टी पालकांना भुरळ घालतात.


शासनाच्या धोरणाचा देखील यात मोठा वाटा आहे. पूर्वी अनुदानित शाळा सर्वसमावेशक होत्या, पण कालांतराने शासनाचा कल खासगी शाळांकडे वळला. मान्यतांमध्ये शिथिलता, आर्थिक सवलती आणि नियमांचा लवचीकपणा यामुळे खासगी शाळांचे वर्चस्व वाढले. शिक्षण हे व्यवसाय बनलं. पालकांकडून आव्वाच्या सव्वा फी वसूल केली जात आहे, त्यावर शासनाचे नियंत्रण राहिलेले नाही. याउलट घटत्या पटसंख्येमुळे अनुदानित शाळा कोंडीत सापडल्या. शासनाचे नियम असे आहेत की, जर एखाद्या शाळेत विद्यार्थ्यांची संख्या ठरलेल्या मर्यादेपेक्षा कमी झाली, तर त्या शाळेतला शिक्षक अतिरिक्त ठरतो, अनुदान बंद केलं जातं किंवा शाळा बंद करावी लागते.

या संकटाचा सर्वांत मोठा फटका शिक्षकांवर बसतो. विद्यार्थी कमी झाले म्हणजे शिक्षकांचे पद कमी केले जाते, त्यांना अतिरिक्त घोषित केले जाते आणि त्यांची दुसर्या शाळेत बदली केली जाते. एका शिक्षकाने आपल्या गावातील मुलांना शिकवायला सुरुवात केली, तो त्या शाळेशी भावनिकरित्या जोडला गेला, पण त्याला घरापासून ५०-६० किलोमीटर दूर, अनोळखी गावात जावं लागतं. ही स्थिती शिक्षकांसाठी मनोवैज्ञानिकदृष्ट्या अत्यंत त्रासदायक असते. तसंच अनेक ठिकाणी एकाच शिक्षकाला सर्व इयत्तांचं शिकवणं, सर्व विषय शिकवणं, शाळेचं प्रशासन पाहणं अशी अनेक जबाबदारी एकाच व्यक्तीवर येतात.

मराठी शाळा रिकाम्या पडल्या तर मातृभाषेच्या माध्यमातून होणारा शिक्षणाचा पाया ढासळेल. मातृभाषेतून शिकवलं की मुलांची बौद्धिक क्षमता अधिक विकसित होते, हे शास्त्रीयदृष्ट्या सिद्ध झालं आहे. जर मुलांना मराठीचं शिक्षण मिळालं नाही, तर सांस्कृतिक वारसा पुढच्या पिढीपर्यंत पोहोचणार कसा? म्हणूनच मराठी शाळा वाचवणं म्हणजे केवळ शैक्षणिक संस्था वाचवणं नाही, तर आपली सांस्कृतिक जडणघडण, आपली अस्मिता जतन करणं आहे.

## थोडक्यात

### जामनेर तालुका साहित्य मंडळातर्फे पूरग्रस्तांसाठी ५१ हजाराचा धनादेश



जामनेर – जामनेर तालुका साहित्य व सांस्कृतिक मंडळा पूरग्रस्तांसाठी मुख्यमंत्री सहायता निधी मध्ये ५१ हजाराचा धनादेश देण्यात आला. साहित्य मंडळाचे संस्थापक अध्यक्ष अमृत यात्री डी. डी. पाटील यांच्या हस्ते राज्याचे आपत्ती व्यवस्थापन मंत्री नामदार गिरीश महाजन यांच्याकडे त्यांनी सुपूर्त केला.–

या वेळी संस्थेचे अध्यक्ष डी. डी . पाटील मनोगत व्यक्त करतांना म्हणाले की अवकाळी पावसामुळे राज्यातील शेतकरी हवालदील झाला आहे. शेतकरी कर्जाच्या खाईत बुडाला असून त्याला या संकटातून बाहेर काढण्यासाठी केवळ शासनावर अवलंबून न राहता प्रत्येकाने मदतीचा हात दिला पाहीजे. राज्याचे आपत्ती व्यवस्थापन मंत्री ना. गिरीष महाजन हे शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी अहोरात्र काम करीत आहे. जी. एम. फाऊंडेशन च्या माध्यमातून शासनाकडून निधी मिळवून देण्यासाठी त्यांचे मोठे योगदान असते. म्हणून अशा संकट काळी त्यांना बळ देण्यासाठी भक्कम पणे त्यांच्या पाठिशी उभे रहावे या भुमिकेतून त्यांनी साहित्य मंडळामार्फत ही मदत दिली असेही ते म्हणाले.

### भरधाव ट्रॉलाच्या धडकेत दुचाकीस्वार प्रौढ गंभीर जखमी

जळगाव – राष्ट्रीय महामार्गावर सावदा वळण रस्त्यावर ट्रालाने दुचाकीला दिलेल्या धडकेत दोनगाव येथील प्रौढ गंभीर जखमी झाल्याची घटना घडली. पाळधी पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पाळधी येथील महामार्गावरील सावदा वळण रस्त्यावर सुरतहून कोलकाता येथे जाणारा ट्राला (एचआर– ५५, एएक्स ७७४६) ने जळगावहून पाळधीकडे येणाऱ्या दुचाकी (एमएच– १९, सीए – १९६२) ला दिलेल्या धडकेत दुचाकी चालक तथा दोनगाव येथील सुधाकर नथ्थू पाटील हे गंभीर जखमी झाले आहेत. त्यांना पुढील उपचारासाठी जळगावच्या जिल्हा रुग्णालयात व त्यानंतर खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सुधाकर पाटील यांच्या डोक्याला गंभीर इजा झाली आहे. दरम्यान, या अपघातामुळे महामार्गावर वाहनांची रांग लागल्या होत्या. पाळधी पोलिसांनी ही वाहतूक सुरळीत केली. अपघातग्रस्त दोन्ही वाहने पाळधी पोलीस चौकीत जमा करण्यात आले असून पाळधी पोलिसांत या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याचे काम उशिरापर्यंत सुरू होते.

### नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या नगराध्यक्ष पदासाठी ६ ऑक्टोबरला आरक्षण सोडत

मुंबई प्रतिनिधी महाराष्ट्रातील २४७ नगरपरिषदा आणि १४७ नगरपंचायती (एकूण ३९४) यांच्या नगराध्यक्ष पदांसाठी आरक्षण निश्चित करण्यासाठी येत्या सोमवारी, ६ ऑक्टोबर २०२५ रोजी मंत्रालयातील परिषद सभागृहात (सहावा मजला) आरक्षणाची सोडत काढण्यात येणार आहे. या प्रक्रियेमुळे आगामी नगरपालिका आणि नगरपंचायत निवडणुकांसाठी इच्छुक नेत्यांमध्ये धाकधूक वाढली आहे. नगर विकास विभागाने ही माहिती जाहीर केली असून, प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने राबवली जाईल.नगराध्यक्ष पदाचे आरक्षण (खुला, मागासवर्गीय, महिला आरक्षण इ.) निश्चित करण्यासाठी ही सोडत महत्त्वाची आहे. मंत्रालयातील सुरक्षितता आणि मर्यादित प्रवेश लक्षात घेऊन प्रत्येक राजकीय पक्षाला केवळ दोन प्रतिनिधींना उपस्थित राहण्याची परवानगी देण्यात आली आहे. पक्षाचे अध्यक्ष किंवा सचिवांनी या दोन प्रतिनिधींची शिफारस करून त्यांना सोडतीसाठी पाठवावे, अशी विनंती प्रशासनाने केली आहे. सोडतीपूर्वी उपस्थित प्रतिनिधींना आवश्यक सूचना आणि मार्गदर्शन दिले जाईल. नगर विकास विभागाच्या उपसचिव प्रियांका कुलकर्णी–छापवाले यांनी जारी केलेल्या पत्रानुसार, ही प्रक्रिया प्रशासकीय नियमावलीनुसार पार पडेल. अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेली ही सोडत आता अंतिम टप्प्यात पोहोचली असून, निवडणुकीची तयारी गती घेईल. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी हा महत्त्वाचा टप्पा आहे, ज्यामुळे राजकीय पक्षांमध्ये रणनीतीबदल होण्याची शक्यता आहे.

या सोडतीमुळे नगरपरिषदा आणि नगरपंचायतींमध्ये आरक्षणाचे निकाल जाहीर होताच, इच्छुक उमेदवारांच्या चढाईला वेग येईल. अधिकृत सूचना आणि मार्गदर्शनासाठी नगर विकास विभागाच्या संकेतस्थळाचा संदर्भ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## कर्तव्यावर असलेल्या डॉक्टरांवर रुग्णाच्या नातेवाईकांकडून हल्ला, कानाच्या पडद्याला गंभीर इजा !; जळगावात शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात घडली घटना

जळगाव : येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात कर्तव्यावर असणाऱ्या डॉक्टरला शिवीगाळ करून बेदम मारहाण केल्याचा प्रकार शुक्रवार दि. ३ ऑक्टोंबर रोजी रात्री साडेआठ वाजेच्या सुमारास घडला आहे.





मोहित दीपक गादिया (वय २६, रा. नवी पेठ, जळगाव) असे जखमी झालेल्या डॉक्टरचे नाव आहे.

ते शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात कनिष्ठ निवासी म्हणून सेवा देत आहेत. दरम्यान, शुक्रवारी दि. ३ ऑक्टोबर रोजी भादली येथे फटाका फुटल्यामुळे किरकोळ जखमी झालेले चार संशयित महिला व पुरुष हे रुग्णालयात उपचारासाठी आले होते. त्यावेळेला रुग्णांच्या नातेवाईकांनी गर्दी केल्यामुळे डॉ. मोहित गादिया व इतर सहकाऱ्यांनी त्यांना, येथे गर्दी करू नका. बाहेर जा. आम्हाला ट्रीटमेंट करू द्या असे सांगितले. त्याचा राग आल्याने नातेवाईकांनी डॉ. मोहित गादिया यांच्या कानशिलात लगावली. तसेच त्याला खाली पाडून लाथा बुक्क्यांनी बेदम मारहाण केली.

या वेळेला इतर सहकाऱ्यांनी धाव घेत डॉ. मोहित यांना नातेवाईकांच्या तावडीतून सोडवले. यानंतर रुग्णालयात जमाव जमा होत असल्याचे पाहून रुग्णाचे नातेवाईक रुग्णाला घेऊन खाजगी दवाखान्यात निघून गेले. घटनेची माहिती काढताच जिल्हापेठ पोलीस स्टेशनचे कर्मचारी रुग्णालयात आले. तसेच डॉ. मोहित गादिया यांच्यावर उपचार करण्यात आले. दरम्यान, कानशिलात लगावल्यामुळे डॉ. मोहित गादिया यांच्या कानाचा पडदा फाटला असून काही आठवडे त्यांना आराम करावा लागणार असल्याची माहिती वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिली.

दरम्यान शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात आपत्कालीन विभागाजवळच पोलीस चौकीची उभारणी केली आहे. मात्र या चौकीमध्ये पोलीस कायमस्वरूपी दिसत नाही.त्यामुळे डॉक्टरांवर हल्ले होण्याचे प्रकार घडतात अशी माहिती निवासी डॉक्टरांनी दिली.

दरम्यान यापूर्वी देखील शल्यचिकित्सा विभागातील डॉ. जैद पठाण व डॉ. अभिनय यांना मारहाण करण्यात आली होती. आता पुन्हा तिसऱ्या डॉक्टरांवर हल्ला झाल्यामुळे सुरक्षा यंत्रणेवर प्रश्नचिन्ह उमटले आहे.

दरम्यान, रुग्णालयात जिल्हा पेठ पोलीस स्टेशनचे एपीआय संतोष चव्हाण व सहकाऱ्यांनी वरिष्ठ वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून घटनेची माहिती जाणून घेतलीा तसेच दोषींवर कारवाई करण्याचे आश्वासन दिले. यावेळेला निवासी डॉक्टरांच्या मार्ड संघटनेने उपअधिष्ठाता डॉ. मारोती पोटे यांना निवेदन देऊन आम्हाला कायमस्वरूपी सुरक्षा पुरवावी यासंदर्भात निवेदन दिले. जिल्हापेठ पोलीस स्टेशनला तक्रार देण्याचे काम रात्री उशिरापर्यंत सुरू होते.

## साकळी येथे दुर्गा उत्सव विसर्जन मिरवणुकीचा जल्लोष – पोलीस व ग्रामस्थांच्या सहकार्याने उत्सव शांततेत संपन्न

उपसंपादक : मिलिंद जंजाळे

साकळी तालुका यावल येथे दिनांक ५ ऑक्टोबर रोजी पारंपरिक उत्साहात व धार्मिक वातावरणात दुर्गा उत्सव विसर्जन मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते. या मिरवणुकीत शेकडो भाविकांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला. संपूर्ण मिरवणूक जल्लोषात पार पडली असून अखेर विसर्जन सोहळा पूर्णपणे शांततेत आणि सलोख्याच्या वातावरणात संपन्न झाला. या यशस्वी आयोजनासाठी साकळी येथील दुर्गा उत्सव मंडळाचे अध्यक्ष व सर्व पदाधिकारी तसेच कार्यकर्त्यांनी अत्यंत जबाबदारीने नियोजन केले. मिरवणुकीदरम्यान पारंपरिक ढोल–ताशा, आकर्षक सजावट व देवीच्या जयघोषाने संपूर्ण गावात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.



या संपूर्ण कार्यक्रमादरम्यान फैजपूर विभागीय पोलीस अधीक्षक अनिल बडगुजर आणि यावल पोलीस निरीक्षक रंगनाथ धारबडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवत उत्कृष्ट समन्वय साधला. यामुळे मिरवणुकीचा कार्यक्रम कोणत्याही अनुचित घटनेशिवाय पार पडला. ग्रामपंचायत व स्थानिक समाजघटकांनीही उत्सव यशस्वी करण्यासाठी मोठे योगदान दिले. साकळी गावाचे सरपंच दीपक पाटील, माजी उपसरपंच किरण महाजन, माळी महासंघ जिल्हा उपाध्यक्ष सुभाष नाना महाजन, प्रगतशील शेतकरी जितेंद्र महाजन, माजी आरोग्य व शिक्षण सभापती रविंद्र पाटील, जितेंद्र वाणी, सर्व मुस्लिम पंच कमेटी, माजी ग्रामपंचायत सदस्य साहेबराव बडगुजर, भूमी फाऊंडेशन चे संचालक डॉ सुनिल पाटील, सहाय्यक पोलिस हवालदार अर्जुन सोनवणे व संपूर्ण पोलिस कर्मचारी, तंटामुक्ती समितीचे सचिव अप्पा खेवलकरसह सर्व सभासद, साकळी गावाचे सर्व ग्रामपंचायत सदस्य तसेच गावातील आजी–माजी पदाधिकारी यांनी उत्सवात सक्रिय सहभाग नोंदवत अमूल्य सहकार्य केले. गावातील नागरिकांनी प्रशासन व कार्यकर्त्यांचे कौतुक केले असून अशा धार्मिक उत्सवांत सामाजिक सलोखा व एकतेचे दर्शन घडवणारा साकळी गावाचा हा उपक्रम आदर्शवत ठरला आहे.

## राष्ट्रीय युवा महोत्सवांतर्गत विकसित भारत चॅलेंज ट्रॅक युवकांना धोरणात्मक नियोजनात सहभागी होण्याची अनोखी संधी

जळगाव (जिमाका): राष्ट्रीय युवा महोत्सवांतर्गत भारत सरकारच्या युवा व क्रीडा मंत्रालयाद्वारे विकसित भारत चॅलेंज ट्रॅक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. युवकांना धोरणात्मक नियोजनात आपले अभिनव विचार मांडण्यासाठी ही अनोखी संधी उपलब्ध झाली आहे.

या उपक्रमाचे चार टप्पे आहेत. ज्यात पहिल्या टप्प्यात (१ सप्टेंबर–१५ ऑक्टोबर २०२५) देशव्यापी ऑनलाईन प्रश्नमंजुषा, My Bharat/My Gov पोर्टल द्वारे अनेक भाषांमध्ये आयोजित केली जाईल, ज्यात सामान्य ज्ञान, आत्मनिर्भर भारत, नशामुक्ती, निरोगी जीवनशैली, लोकल फॉर व्होकल यासारखे विषय समाविष्ट आहेत. विजेते २० ऑक्टोबर रोजी जाहीर होतील. दुसऱ्या टप्प्यात (२३ ऑक्टोबर–५ नोव्हेंबर २०२५) निबंध स्पर्धा, ५०० शब्दांचा निबंध My Bharat पोर्टलवर सादर करावा लागेल. निकाल १९ नोव्हेंबरला जाहीर केला जाईल.

ग्रामीण भागातील युवकांना प्रोत्साहन देण्यासाठी, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाच्या कॉमन सर्व्हिस सेंटर सुविधा वापर करण्यास प्रोत्साहन दिलेले आहे. तर तिसऱ्या टप्प्यात– विकसित भारत पीपीटी स्पर्धा– राज्यस्तरीय (२४ नोव्हेंबर–८ डिसेंबर २०२५) दरम्यान, राज्य अजिंक्यपद फेरीमध्ये युवकांना पीपीटी सादरीकरणाद्वारे आपले विचार मांडतील, मुल्यांकन, नेतृत्व, सहकार्य क्षमता आणि सादरीकरण कौशल्यावर आधारित केले जाईल. निकाल १२ डिसेंबर रोजी जाहीर होईल.चौथ्या टप्प्यात– (१०–१२ जानेवारी २०२६) राष्ट्रीय युवा महोत्सवात, विकसित भारत चॅम्पियनशिप कार्यक्रमात,नवी दिल्ली येथे अंतिम स्पर्धकांना मार्गदर्शकांसमोर थीमनिहाय सादरीकरणाची संधी मिळेल. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या युवकांना १२ जानेवारी रोजी माननीय पंतप्रधानांसमोर त्यांचे विचार मांडण्याची संधी मिळेल.

उपक्रमातील विषयांमध्ये निरोगी जीवनशैली, नशामुक्त युवा, आत्मनिर्भर भारत, महिलांचे नेतृत्व, रोजगार संधी, सहभागात्मक लोकशाही, सर्वसामावेशक विकास आणि हवामान सहनशील भारत या मुद्द्यांचा समावेश आहे.

१५ ते २९ वर्षे वयोगटातील युवकांना सहभागी होता येणार आहे, सहभागी होण्यासाठी My Bharat पोर्टलवर नोंदणी अनिवार्य आहे. असे जिल्हा क्रीडा अधिकारी, जळगाव यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे.

## वृध्द महिलेची ६४ हजारांची सोन्याची पोत लंपास

जळगाव– धरणगाव शहरातील बसस्थानकात बसमध्ये चढत असलेल्या ७० वर्षीय वृध्द महिलेच्या गळ्यातील सुमारे ६४ हजार रुपये किमतीची सोन्याची पोत अज्ञात चोरट्याने चोरून नेली. याप्रकरणी दुपारी २ वाजता धरणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस चोरट्याचा शोध घेत आहेत.

बेबाबाई आनंद वाघमारे (वय ७०, रा. गौतम नगर, धरणगाव) असे या फिर्यादी महिलेचे नाव आहे. शनिवार ४ ऑक्टोबर रोजी ही घटना सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास धरणगाव बसस्थानकामध्ये घडली. बेबाबाई वाघमारे या बसमध्ये चढत असताना गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने त्यांच्या गळ्यातील सोन्याची पोत अलगदपणे लंपास केली. या पोतीची किंमत अंदाजे ६४,००० रुपये आहे.

## दुचाकीचा भिषण अपघात; एक जण जागीच ठार

जळगाव यावल तालुक्यातील अंजाळे गावाजवळील मोर नदीच्या पुलावर शनिवारी एक दुर्दैवी घटना घडली. ट्रक आणि दुचाकी यांच्यात झालेल्या भीषण अपघातात टाकरखेडा येथील ५५ वर्षीय दुचाकीस्वार संतोष धनगर यांचा जागीच मृत्यू झाला. हा अपघात इतका जबरदस्त होता की, दुचाकी पूर्णतः चिरडली गेली. यावल पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

संतोष उखडू धनगर (वय ५५, रा. टाकरखेडा, ता. यावल) हे भुसावळकडून यावलच्या दिशेने दुचाकी (क्र. एम. एच. १९ डी.क्यु.७३६९) वरून जात असताना मोर नदीच्या पुलावर समोरून भरधाव वेगात येणाऱ्या ट्रकने (क्र. एम. एच. ३४ बी.जी. ५०१५) त्यांना जोरदार धडक दिली. ही धडक इतकी तीव्र होती की, पुलाच्या वळणावरच संतोष धनगर यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच अंजाळे ग्रामपंचायतचे सदस्य आनंद सपकाळे आणि गावातील काही नागरिक तातडीने घटनास्थळी पोहोचले. त्यांनी पोलिसांना घटनेची माहिती दिली. यावल पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी यावल ग्रामीण रुग्णालयात हलविला. या प्रकरणी संतोष धनगर यांचे नातेवाईक दीपक धनगर यांच्या तक्रारीवरून ट्रकचालकाविरुद्ध अपघाताचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## जामनेर तालुक्यातील २४ ग्रामपंचायतींना आय.एस.ओ. दर्जा

जळगाव ( प्रतिनिधी ) – जिल्हा परिषद, जळगावच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात पंचायत राज समृद्ध ग्रामपंचायत अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत हाती घेण्यात आलेल्या आय.एस.ओ. ग्रामपंचायत मोहिमेत जामनेर तालुक्यातील तब्बल २४ ग्रामपंचायतींनी उल्लेखनीय कामगिरी करत आय.एस.ओ. दर्जा प्राप्त केला आहे. या साठी जामनेर येथील गट विकास अधिकारी श्रीकृष्ण इंगळे यांनी विशेष परिश्रम घेतले आहेत.

जामनेर तालुक्यातील आय.एस.ओ. दर्जा प्राप्त ग्रामपंचायती पुढीलप्रमाणे आहेत –



फत्तेपूर, लोंढरी, मेनगाव, टाकळी, गारखेडा, हिवरखेडा, पळसखेडा, निमखेडी पिंप्री, बेटावद, एकुलती, चिंचोली, पळसखेडा प्र.न., लोणी, हिंगणे, पिंपळगाव गोलाईत, मादणी, सवतखेडे, सुनसगाव, कोदोली, ओझरखेड, पहूर पेठ, नेरी, गाडेगाव व वाकी. या ग्रामपंचायतींनी प्रशासनिक कामकाज, पारदर्शकता, नागरिकाभिमुख सेवा, स्वच्छता, हरित उपक्रम, डिजिटल व्यवहार आणि सामाजिक उपक्रम आदी क्षेत्रांत आदर्शवत कामगिरी करून ग्रामविकासाची नवी दिशा दाखवली आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांनी याबाबत समाधान व्यक्त करताना सांगितले की, समृद्ध आणि आत्मनिर्भर ग्रामपंचायत घडविणे हेच पंचायत राज व्यवस्थेचे खरे बळ आहे. जामनेर तालुक्यातील या २४ ग्रामपंचायतींनी संपूर्ण जिल्ह्यासमोर आदर्श निर्माण केला असून, इतर ग्रामपंचायतींनीही त्यांचा आदर्श घेत पुढाकार घ्यावा.

जिल्हा परिषदेच्या या अभियानामुळे ग्रामपंचायतींच्या कामकाजात गुणवत्ता, पारदर्शकता आणि कार्यक्षमतेस नवे परिमाण लाभले असून, ग्रामपंचायत प्रशासनातील जनविश्वास अधिक वृद्धिंगत झाला आहे.

## थोडक्यात

### थरार : बिबट्याचा हल्ला, पित्याने प्रसंगावधान राखून वाचवले मुलाचे प्राण !



यावल ( प्रतिनिधी ) - तालुक्यातील डोंगरकठोरा गावाजवळील सातपुड्याच्या कुशीत असलेल्या धुळे पाडा या आदिवासी वस्तीतील ६ वर्षीय बालकावर बिबट्याने अचानक हल्ला चढवला. मात्र, त्याच्यासोबत असलेल्या वडिलांच्या प्रसंगावधानामुळे बालकाचा जीव थोडक्यात वाचला. ही घटना गुरुवारी सायंकाळी घडली. या घटनेमुळे यावल तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे. धुळे पाडा येथील रहिवासी इगरा झेंदला बारेला (वय २८) हा गुरुवारी सायंकाळी मुलगा महेश (वय ६) याला सोबत घेऊन गवत आणण्यासाठी शेतात गेला होता. गवताचे ओझे घेऊन दोघे परत येत असताना, पाठीमागून अचानक बिबट्याने मुलावर प्राणघातक हल्ला केला. मुलगा महेश हा जोरात किंचाळताच वडिलांनी क्षणाचाही विलंब न करता डोक्यावरचे गवताचे ओझे थेट बिबट्याच्या अंगावर फेकून प्रतिकार केला. त्यामुळे बिबट्याने मागे हटून तिथून पळ काढला. या हल्ल्यात महेशच्या डोक्याला आणि मानेजवळ गंभीर जखमा झाल्या आहेत. त्याला तातडीने यावल ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यानंतर शुक्रवारी बालकाला पुढील उपचारांसाठी जळगाव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात हलविण्यात आले. घटनेमुळे यावल तालुक्यात खळबळ उडाली असून बिबट्याचा बंदोबस्त करण्याची मागणी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आली आहे.


### कुटुंबीय घराबाहेर जाताच चोरट्यांनी केली घरफोडी, पावणे २ लाखांचा ऐवज लंपास

जळगाव- शहरातील खोटे नगर परिसरात रावण दहन पाहण्यासाठी गेलेले सुरेश भागवत जगताप (वय ५१, रा. सत्यम पार्क) यांच्या घरातून चोरट्यांनी रोख ७० हजार रुपयांसह सोने-चांदीचे दागिने असा एकूण एक लाख ७५ हजार रुपये किमतीचा ऐवज चोरून नेला. याप्रकरणी जळगाव तालुका पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.विजयादशमी सणाच्या दिवशी सुरेश जगताप हे खोटे नगर परिसरात रावण दहन पाहण्यासाठी तर त्यांच्या पत्नी व मुले अन्य ठिकाणी गेले होते. त्यामुळे घर बंद असल्याची संधी साधत चोरट्यांनी घरातून रोख ७० हजार रुपये, १३ ग्रॅम वजनाचे सोन्याच्या वेगवेगळ्या दागिन्यांसह चांदीचे दागिने असा एकूण १ लाख ७५ हजार रुपये किमतीचा ऐवज चोरून नेला. पत्नी व मुले घरी आले त्या वेळी हा प्रकार लक्षात आला. त्यांनी याविषयी पतीला कळविले.या संदर्भात शुक्रवारी तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद देण्यात आली. त्यावरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोउनि विजय पाटील करीत आहेत.

### जामठी ग्रा. पं. सदस्या उषाबाई पाटील अपात्र

जामठी-येथील माजी सरपंच तथा विद्यमान ग्रामपंचायत सदस्या उषाबाई हरी पाटील यांनी भामटा राजपूतचे बनावट जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर केले होते. या प्रकरणी यांच्या प्रतिस्पर्धी उमेदवार विद्या ईश्वर महाजन यांनी उषा पाटील यांच्या जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्रावर हरकती नोंदवल्यानंतर जिल्हा जात पडताळणी समितीने विद्या महाजन यांच्या बाजूने निकाल देत १६ जुलै २०२५ रोजी विद्यमान सदस्या उषाबाई पाटील यांचे भामटा राजपुत या जातीचे जात प्रमाणपत्र, जातवैधता प्रमाणपत्र बनावट असल्याचे शिक्कामोर्तब केले व तसा निकाल पारित केला. आणि समितीने संबंधित बनावट प्रमाणपत्रे जप्त करून सरकारजमा करण्याचे आदेश जळगांव प्रांतधिकारी यांना दिलेले आहेत.पुढील कार्यवाहीसाठी संबधित प्रकरण सुनावणीसाठी जातपडताळणी समितीने जिल्हाधिकारी यांचे कडे पाठविल्या नंतर सदर प्रकरणाची दि. १९ ऑगस्ट २०२५ रोजी जिल्हाधिकारी यांच्या समोर सुनावणी होऊन ३ सप्टेंबर २०२५ रोजी निकाल पारित झाला. नुकत्याच दि.२६ सप्टेंबर २०२५रोजी निकालाच्या प्रती तहसीलदार बोदवड यांच्या तर्फे संबंधितांना बजाविण्यात आल्यात.त्यात निकाल लागण्याच्या तारखेपासूनच जिल्हाधिकारी यांनी उषाबाई पाटील यांचे सदस्य पद रद्द करून पुढील काळासाठी अपात्र घोषित केलेले आहे.या प्रकरणात जातपडताळणी समिती कडून निकाल विरोधात गेल्या गेल्याच उषाबाई पाटील यांनी कारवाई टाळण्यासाठी घाई घाईने सदस्यपदाचा राजिनामा दिला होता. मात्र त्याचासुध्दा निकालावर कुठलाही परिणाम झालेला नाही.उषाबाई पाटील यांनी निवडणूक लढते वेळी खोटे व बनावट कागदपत्रे सादर करुन पद मिळविले, शासनाचे मानधन व मिटिंग भत्ते प्राप्त करून शासनाची व निवडणुक आयोगाची फसवणूक करुन गुन्हा केलेला आहे.

# विसर्जन करताना तरुण वाहून गेला, बहिणीसह आईच्या डोळ्यादेखत घडली घटना !





जळगाव – शहरातील निमखेडी शिवारात रेल्वे पुलाजवळ तसेच बांभोरीच्या दिशेने असणाऱ्या गिरणा नदीमध्ये शुक्रवार दि. ३ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजेच्या सुमारास देवीमातेच्या मूर्तीचे विसर्जन करण्यास गेलेला तरुण वाहून गेल्याची धक्कादायक घटना उघड झाली आहे. अग्निशमन दलाच्या अथक प्रयत्नानंतर देखील तरुण मिळून आला नाही. त्यामुळे मदत कार्य थांबवण्यात आले आहे.

हिमेश संतोष पाटील (वय १९, रा.मयुरेश्वर कॉलनी, दादावाडी परिसर, जळगाव) असे बेपत्ता झालेल्या तरुणाचे नाव आहे. परिवारासह तो राहत होता. दरम्यान शुक्रवारी दि. ३ सप्टेंबर रोजी दुपारी साडेअकरा वाजता निमखेडी रेल्वे पुलाजवळ आई आणि बहिणीसोबत विसर्जन करण्यासाठी निघाला होता. दुपारी १२ वाजता रेल्वे पुलाजवळ हिमेश पाटील याने देवी मातेच्या मूर्तीचे विसर्जन केले. त्यानंतर पाय घसरून तो नदीपात्रात वाहून गेला. महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाला माहिती मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेतली.

त्या ठिकाणी त्यांनी बचाव कार्य सुरू केले. रेल्वे पुलाच्या खाली तसेच बांभोरी गावाच्या दिशेने, नवीन हायवे तयार झाला आहे त्या दिशेला देखील त्यांनी शोध कार्य केले.मात्र हिमेश पाटील आढळून आला नाही. संध्याकाळी अंधार पडल्यामुळे शोध कार्य थांबवण्यात आले. दरम्यान आई आणि बहिणीच्या समोरच ही घटना घडल्यामुळे त्यांनी घटनास्थळी केलेला आक्रोश मन हेलावणारा होता.

शोधकार्यासाठी जळगाव महानगरपालिकेचे अग्निशमन दलाचे अधिकारी शशिकांत बारी यांच्या मार्गदर्शनाखाली वाहन चालक देविदास सुरवाडे, संतोष तायडे, महेश पाटील, रवी भोई, रोहिदास चौधरी, संदीप कोळी, तसेच सर्पमित्र जगदीश बैरागी यांनी शोध कार्य केले.

# घ. का. विद्यालय, आमोदे येथे व्यसनमुक्ती उद्बोधन व चित्रप्रदर्शन कार्यक्रम

## प्रा. डॉ. दयाघन राणे यांचे मार्गदर्शन तरुणांनी व्यसनाला ठाम नकार द्यावा

यावल तालुका प्रतिनिधी
( राहुल जयकर )




घ. का. विद्यालय, आमोदे येथे दिनांक ४ ऑक्टोबर रोजी व्यसनमुक्ती उद्बोधन व चित्रप्रदर्शन कार्यक्रम संपन्न झाला. विद्यालयाच्या तंबाखूमुक्त शाळा समिती तर्फे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

महात्मा गांधी व्यसनमुक्ती सप्ताह (२ ते ९ ऑक्टोबर) निमित्त आयोजित या कार्यक्रमासाठी नशाबंदी मंडळ, महाराष्ट्र राज्य चे नाशिक विभागीय संघटक प्रमुख प्रा. डॉ. दयाघन एस. राणे हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते, तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. संजय बोठे यांनी भूषविले.

प्रा. डॉ. राणे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात विद्यार्थ्यांना व्यसनाच्या दुष्परिणामांविषयी जागरूक करत सांगितले की, आजचा समाज व्यसनाधीनतेकडे झुकत असून त्यात तरुणांचे प्रमाण अधिक आहे. भारतात दरवर्षी तब्बल १५ लाख लोक तंबाखूच्या दुष्परिणामांमुळे मृत्युमुखी पडतात. त्यांनी पुढे सांगितले की, गुटखा, दारू, सिगारेट आणि तंबाखू यांसारख्या अमली पदार्थांपासून दूर राहणे गरजेचे आहे. मित्रांच्या आग्रहाला ठाम नकार देणे हेच खरे धैर्य आहे.

मोबाईलच्या व्यसनाविषयीही त्यांनी विद्यार्थ्यांचे लक्ष वेधले. लहान मुलांमध्ये मोबाईल वापराचे प्रमाण चिंताजनक आहे. आयआयटी मुंबईच्या संशोधनानुसार मोबाईलच्या अतिवापरामुळे कॅन्सरचा धोका ४०० टक्क्यांनी वाढल्याचे आढळले आहे. त्यामुळे मोबाईलचा वापर अभ्यासापुरता मर्यादित ठेवावा, असा सल्लाही त्यांनी दिला.

अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापक श्री. संजय बोठे यांनी विद्यार्थ्यांना जीवनशैलीत सकारात्मक बदल घडविण्याचे आवाहन केले. त्यांनी सांगितले की, शारीरिक व मानसिक स्वास्थ्य टिकवण्यासाठी विद्यार्थ्यांनी विविध छंद जोपासावेत, मैदानी खेळ खेळावेत आणि आपल्या संस्कृतीनुसार शिस्तबद्ध जीवन जगावे. त्यामुळे व्यसनांपासून आपोआपच दूर राहता येते.

त्यांनी पुढे सांगितले की, विद्यालय तंबाखूमुक्त शाळा म्हणून कार्यरत असून, विद्यार्थ्यांना आवश्यक ते मार्गदर्शन व सहकार्य सदैव दिले जाईल.

कार्यक्रमानंतर नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य तर्फे उपलब्ध करून दिलेल्या व्यसनमुक्ती जनजागृती पोस्टर्स चे प्रदर्शन विद्यार्थ्यांसाठी खुले करण्यात आले. शिक्षकांनी पोस्टर्समधील संदेश समजावून देत विद्यार्थ्यांना व्यसनमुक्त जीवनाचा संकल्प करण्यास प्रेरित केले.

या प्रसंगी रोटरी क्लब ऑफ भुसावळ चे सदस्य आणि सामाजिक कार्यकर्ते श्री. गजानन सेवलकर, शाळेतील शिक्षकवृंद तसेच शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. व्ही. एस. पाटील यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्री. पी. एस. पाटील यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळेच्या सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# गांधी जयंती सप्ताहानिमित्त शिरसोली प्र.न येथे सामूहिक स्वच्छता अभियान



जळगाव -महात्मा गांधी जयंती सप्ताहाच्या निमित्ताने शिरसोली प्र.न येथे गांधी रिसर्च फाऊंडेशन आणि ग्रामपंचायत शिरसोली प्र.न यांच्या संयुक्त विद्यमाने सामूहिक स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले. ग्रामपंचायत परिसरात राबविण्यात आलेल्या या स्वच्छता मोहिमेत गावातील नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. या उपक्रमात ग्रामपंचायत सरपंच व सदस्य हिलाल भिल्ल, रामकृष्ण काटोले, मुदस्सर पिंजारी, श्रावण ताडे तसेच सामाजिक कार्यकर्ते गिरीश वराडे, उमेद अभियानातील महिला वर्ग, आरोग्य सेवक प्रवीण भोळे यांनी सक्रिय सहभाग घेतला. गांधी रिसर्च फौंडेशनचे सहकारी डॉ. अश्विन झाला, सुधीर पाटील, दीपक मिश्रा, प्रशांत सूर्यवंशी, विक्रम अस्वार तसेच पीजी डिप्लोमाचे विद्यार्थी यांनीही स्वच्छता मोहिमेत सहभाग नोंदविला. या उपक्रमातून ‘स्वच्छ गाव, सुंदर गाव’ या संकल्पनेला बळकटी देत ग्रामस्थांमध्ये स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्यात आले. सहभागी सर्वांनी अशा उपक्रमांना सातत्याने हातभार लावण्याचा निर्धार व्यक्त केला.

# ज्वेलर्समधील १४ लाखांचे सोने चोरून बंगाली कारागीर फरार

जळगाव - सोन्याचे दागिने घडविणाऱ्या एका कारागीराने ज्वेलरीमधून सुमारे १३ लाख ९८ हजार रुपये किमतीचे सोने लुटले. शहरातील बालाजी पेठेतील लक्ष्मीनारायण ज्वेलर्स येथे ही घटना उघडकीस आली. या प्रकरणी शनिपेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.बिस्वजीत बनेस्वर सासमल (सोने कारागीर, हमु रिधुरवाडा, मुळ रा. वार्ड नं. १० जयनगर पश्चिम मेदिनीपूर, पश्चिम बंगाल) याच्या विरुध्द गुन्हा दाखल झाला. ३ लाख ७२ हजार किमतीचे ३१ ग्रॅम वजनाचे २४ कॅरेट सोन्याचा एक तुकडा, ५ लाख १८ हजार किमतीचे अंदाजे ४७ ग्रॅम वजनाचे २२ कॅरेटची सोन्याची लगड, २ लाख ९८ हजार किमतीचे अंदाजे २७ग्रॅम वजनाचे २२ कॅरेटची सोन्याची लगड, २ लाख १० हजार किमतीचे अंदाजे १९ ग्रॅम वजनाची २२ कॅरेटची सोन्याची लगड असा सुमारे १३ लाख ९८ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल संशयिताने लंपास केला. उपनिरीक्षक योगेश ढिकले हे तपास करीत आहेत.

# पाऊस, ढगफुटी झाल्याने महाराष्ट्रात ओला दुष्काळ जाहीर करावा-बच्चू कडू यांनी सरकारवर केला प्रहार




कासोदा- कासोदा येथे ५ ऑक्टोबर रोजी शेतकरी संवाद सभा आयोजित करण्यात आली होती. सभेला बच्चू भाऊ कडू यांनी शेतकरी कर्ज माफी, शेत मजूर, दिव्यांग तसेच ढगफुटी सदृश्य महाराष्ट्रात पाऊस झाल्याने महाराष्ट्रात ओला दुष्काळ जाहीर करावा व भिक नव्हे हक्काची कर्ज माफी मिळावी तसेच वसंत सहकारी साखर कारखाना बंद असल्यामुळे तोही सुरू करण्यात यावा, अश्या अनेक विषयांवर लक्ष वेधून सरकारचा समाचार घेतला. तसेच दि.२८ ऑक्टोबर रोजी नागपूर येथे महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे म्हणून सर्व शेतकरी बांधवांनी या मोर्चात सहभाग घ्यावा, असेही यावेळी बच्चू कडून यांनी आवाहन केले.माजी खासदार उन्मेश पाटील हे देखील उपस्थित होते व प्रहार जनशक्ती पक्षाचे कार्य अध्यक्ष बल्लू जजांळ, नाशिकचे जिल्हा अध्यक्ष गणेश निंबाळकर, पक्ष निरीक्षक निलेश वटाणे, अ‍ॅड. विश्वास भोसले, अ‍ॅड. वासुदेव वारे, कृषी भुषण समाधान दयाराम पाटील, हिंमत महाजन भडगाव तालुका अध्यक्ष, छावा संघटनेचे तालुकाध्यक्ष उमेश पाटील, प्रहार जनशक्ती पक्षाचे एरंडोल तालुका अध्यक्ष सुनिल पाटील उमरेकर, तालुका सरचिटणीस अनिल पाटील, सुनिल हरगुडे, छबु नाना , मधुकर समदानी, राजेश ठाकरे इतर मान्यवर हजारोंच्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

# जळगाव पॅटर्न’ आता राज्यभर: शालेय शिक्षण विभागाचा माजी विद्यार्थी संघ स्थापनेचा निर्णय

जळगाव-राज्यातील सर्व जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका, अनुदानित आणि खासगी प्राथमिक, माध्यमिक तसेच उच्च माध्यमिक शाळांमध्ये माजी विद्यार्थी संघ स्थापन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य शालेय शिक्षण विभागाने घेतला आहे. शाळांच्या प्रगतीत माजी विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग, शाळेशी भावनिक नाते दृढ करणे आणि सामाजिक बांधिलकी जोपासणे या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे. जळगाव जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांच्या संकल्पनेतून प्रथम जळगावात राबवलेला हा नाविन्यपूर्ण प्रयोग, आता ‘जळगाव पॅटर्न’ म्हणून राज्यभर लागू होणार आहे.

‘जळगाव पॅटर्न’ची पायाभरणी

मिनल करनवाल यांनी ४ एप्रिल २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित कार्यक्रमात जळगाव जिल्ह्यातील शाळांमध्ये माजी विद्यार्थी संघ स्थापनेची संकल्पना जाहीर केली होती. सध्या जळगाव जिल्ह्यात २० हून अधिक माजी विद्यार्थी संघ यशस्वीपणे कार्यरत असून, त्यांच्या उपक्रमांमुळे शाळांच्या भौतिक सुविधा, शिक्षणाची गुणवत्ता आणि सामाजिक उपक्रमांमध्ये सकारात्मक बदल दिसत आहेत. या यशस्वी प्रयोगामुळे शालेय शिक्षण विभागाने हा पॅटर्न राज्यभर राबवण्याचे आदेश जारी केले आहेत.

संघाची रचना: माजी विद्यार्थी संघात अध्यक्ष, उपाध्यक्ष, कोषाध्यक्ष आणि मुख्याध्यापक/प्राचार्य (सचिव म्हणून) असतील. याशिवाय एक पालक प्रतिनिधी आणि निवृत्त शिक्षक किंवा अधिकारी सल्लागार सदस्य म्हणून सहभागी होतील.मेळावे आणि स्नेहसंमेलन: प्रत्येक शाळेने वर्षातून किमान एकदा माजी विद्यार्थी मेळावा किंवा स्नेहसंमेलन आयोजित करणे बंधनकारक आहे. गणेशोत्सव, दसरा, दिवाळी, ईद, ख्रिसमस यांसारख्या सणांच्या निमित्ताने हे कार्यक्रम होणार आहेत.

उपक्रम: माजी विद्यार्थ्यांचा सत्कार, शाळेचा विकास आराखडा, शिक्षक सन्मान आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचा समावेश असेल.माजी विद्यार्थी शाळांच्या भौतिक सुविधांच्या उभारणीत मार्गदर्शन आणि आर्थिक सहकार्य करतील. विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन, शिष्यवृत्ती आणि प्रेरणा देण्यावर भर असेल. तसेच, पर्यावरणपूरक आणि सामाजिक उपक्रमांना चालना दिली जाईल. यासाठी शासनाने विशेष ऑनलाइन नोंदणी प्रणाली विकसित केली असून, प्रत्येक माजी विद्यार्थ्याची नोंदणी अनिवार्य आहे. शाळांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमांचे फोटो आणि अहवाल या पोर्टलवर अपलोड करावे लागतील.

जळगाव जिल्ह्यात मिनल करनवाल यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या या उपक्रमाने शाळांचा चेहरामोहरा बदलला आहे. हा प्रयोग आता राज्यभर राबवला जाणार असल्याने, जळगावने शालेय शिक्षण क्षेत्रात एक आदर्श निर्माण केला आहे. माजी विद्यार्थी संघांमुळे शाळा आणि समाज यांच्यातील दुवा अधिक मजबूत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

हे वत्तपत्र, मुद्रक, प्रकाशक, व मालक सुमेध पद्माकर सोनवणे यांनी रिया प्रिंटर्स, अजिंठा चौफुली, सातपुडा ऑटो जवळ, जळगाव येथे छापून स.नं. 29/अ, प्लॉट नं. 98, अजिंठा बॅकवर्ड सोसायटी, एमआयडीसी, जळगाव - 425001 येथे प्रसिद्ध केले. संपादक - सुमेध पद्माकर सोनवणे (आरएनआय नं. - MAHMAR/2023/85315)
Printed, published and Owned by Sumedh Padmakar Sonawane, and printed at Riya Printers, Ajinta Chaufuli Near Satpuda Auto Jalgaon – 425001 and published at S.No.29/A, Plot No.98, Ajintha Backword Society,MIDC, Jalgaon -425001, Editor - Sumedh Padmakar Sonawane (RNI NO. - MAHMAR/2023/85315)